आर.सी.एस क्र.६५/२०२२
लता वि. प्रदिप
नि.क्र.२९

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०१ यांचा उर्वरित सरतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -प्रदिप वसंतराव तिवसे.

**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ चा उर्वरित सरतपास शपथेवर श्री जी.आर.हुंगे यांच्या मार्फत सुरू.</u>**

**viii)** आता मला दि.२७/१०/२०२० रोजीच्या अस्सल मृत्यपत्राचा लेख जो माझ्या आईने माझ्या नावे करून दिलेला आहे तो दाखविण्यात आला तो तोच आहे त्यावर माझी आई नामे कमलाबाई वसंत तिवसे ह्यांचा फोटो आहे व त्यावर त्यांची सही व आंगठ्याची निशानी आहे तसेच साक्षदार म्हणून संजय सुर्यवंशी व श्रावण हेडाऊ यांची नावे आहेत तसेच त्याची सही व आंगठ्याची निशानी आहे. त्यापैकी साक्षीदार संजय सर्यवंशी हा मयत झालेला आहे. सदर मृत्यूपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात आला.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>वादी क्र.१ व २ तर्फे ॲड श्री.एल.आर.मांडवकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू.</u>**

**८.** हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत मालमत्ता ही वादी व प्रतिवादी म्हणजेच मी असे आमची आजी नामे चंद्राबाई बिंदुजी डोंगरे यांच्या मालकीची होती. चंद्राबाई बिंदुजी डोंगरे ह्या सन १९९० मध्ये मयत झालेल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई नामे कमलाबाई ह्या माझ्या आजी यांच्या एकमेव वारस होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजीच्या मृत्यूनंतर माझ्या आईचे नाव माझ्या आजीचे वारस म्हणुन वादमिळकतीच्या महसुल नोंदीवर चढले.

**९.** चंद्राबाई ही मुळ वढेगाव ता.उमरेड येथील रहिवासी होती. कमलाबाई म्हणजेच माझ्या आईला नागपुर येथे दिले होते. माझा व माझ्या बहीणीचा जन्म नागपुर येथे झालेला आहे. माझी बहीण लता हिचे लग्ण सन १९९१ मध्ये झाले होते. माझी दुसरी बहीण मनिषा कोहपरे हिचे लग्न माझ्या लग्णाच्या पुर्वी दोन चार वर्ष अगोदर म्हणजेच सन २००० मध्ये झाले असावे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दोन्ही बहीणींचे लग्ण झाले त्यावेळी माझे वडील नामे वसंत महादेवराव तिवसे हे जिवंत होते व ते सन २००८ साली मयत झाले. माझे वडील जिवंत होते तोपर्यंत माझे व माझ्या वडीलांचे माझ्या बहीणींसोबत चांगले संबंध होते.

माझी आई कमलाबाई ही सन २०२२ मध्ये मयत झाली. माझ्या आईचे माझ्या बहीणींसोबत चांगले संबंध होते. माझी लता नावाची बहीण नागपुर येथे राहते.

**१०.** आर्टीकल अ वरिल मृत्यपत्र तयार करतेवेळी लागणारे कागदपत्र माझी आई कमलाबाई हीनेच आणले होते. सदर मृत्यूपत्र तयार करण्याकामी लागणारे वादमिळकतीच्या ७/१२ चे उतारे माझ्या आईनेच तहसिलमध्ये आणले असेल कारण मी त्या दिवशी कामाला गेलेलो होतो. सदर दिवशी मी पेंटींगच्या कामाला गेलो होतो. माझ्या आईने कागदपत्र काढल्यानंतर ती कोठे गेली होती हे मला माहिती नाही. ज्यावेळी आर्टीकल अ मृत्यूपत्र नोंदणी करण्यात आला त्यावेळी मी तेथे हजर नव्हतो. माझ्या आईने तयार केलेले मृत्यपत्र कोठे नोंदणिकृत करण्यात आले होते हे मला माहित नाही कारण मी गेलोच नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, सदर मृत्यूपत्र तयार करण्यासाठी लागणारे कागदपत्र कोणी आणले, सदर कागदपत्र कोठे तयार करण्यात आले, ते कोणी तयार केले व सदर मृत्यूपत्र कोठे नोंदणी केले याबाबत मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई सदर मृत्यूपत्र नोंदणी करण्यासाठी कशी व कोठे गेली याबाबत मला माहिती नाही.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल अ मृत्यपत्रावरिल फोटो तसेच त्यावरील सह्या ज्या कमलाबाई व साक्षीदारांनी केलेल्या आहेत त्या माझ्यासमक्ष केलेल्या नाही. सदर आर्टीकल अ मृत्यपत्राबाबत मला माझ्या आईच्या मृत्यूनंतर माहिती झाले. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई जिवंत आतांना मला सदर मृत्यूपत्राबाबत माझ्या आईने मला सांगितले नव्हते.

**प्रश्न-**मृत्यूपत्राबाबत वादीला कल्पना होती काय?

**उत्तर-**त्यांना कल्पना नसेल, कारण मलाच कल्पना नव्हती.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईचे व माझे संबंध चांगले नव्हते. मृत्यूपत्र हे माझ्या आईचा मृत्यू झाल्यानंतर तिस-या दिवसानंतर साफसफाई करतांना कपाटात दिसले. सदरचे कपाट हे आलमारीचे कपाट होते ज्यामध्ये माझी आई पासबुक ठेवायची त्यामध्ये सदर मृत्यूपत्र माझ्या आईने ठेवलेले होते. सदर कपाटाची चाबी ही माझ्या आईजवळच राहत होती. असे काही नाही की, माझ्यावर विश्वास नसल्याने माझी आई सदर कपाटाची चाबी तिच्याजवळ ठेवायची.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईला मयत होण्याच्या दहा ते अकरा

वर्षापुर्वीपासुनच पॅरालिसीस हा आजार होता.

**प्रश्न-**तुम्ही सदर आजारामध्ये तुमच्या आईची सेवासुश्रुषा केली नाही?

**उत्तर-**आजार नसल्याने सेवा करण्याचा प्रश्नच नाही.

हे म्हणणे खरे नाही की, वादी यांनी माझ्या आईला नेरकर हॉस्पीटल, ईटकेलवार हॉस्पीटल व मेडिकल हॉस्पीटल नागपुर येथे उपचाराकामी भरती केले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या आईची काही काळजी केली नाही तर याउलट माझ्या आईची काळजी वादी यांनी केली.

**प्रश्न-**तुमच्या वडीलांनी तुम्हाला गव्हर्नमेंट प्रेसमध्ये लेबर म्हणुन लावुन दिले होते काय?

**उत्तर-**नाही. माझ्या वडीलांनी मला शिकाऊ उमेद्वार म्हणून गव्हर्नमेंट प्रेसमध्ये लावुन दिले होते.

मी सदर गव्हर्नमेंट प्रेसमध्ये दोन वर्ष काम केले व त्यानंतर माझे प्रशिक्षण शिवराज लिथो आफसेट वर्क यामध्ये झाले.

**प्रश्न-**तुम्ही तुमचे प्रशिक्षण झाल्यानंतरही जॉब केला नाही बरोबर आहे काय?

**उत्तर-**मला जॉब मिळाला नाही.

हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मला दारूचे व्यसन असल्याने मी नोकरी टिकउ शकलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व माझ्या पत्नीचे वाद झाले त्यावेळी वादी व त्यांच्या पतिंनी वाद सोडविला. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईला पॅरालिसीस हा आजार झाल्याने तिच्या शरिराचा डावा भाग अपंग झाला होता त्यामुळे तिला स्मरणशक्ती नव्हती.

**१३.** मृत्यूपत्रावरील साक्षीदार हे माझ्या आईच्या ओळखीचे होते. सदर साक्षीदार हे माझ्या नातेसंबंधातले नाही. सदर साक्षीदार हे आमच्या जातीचे नाही. मृत्यपत्रावरील साक्षीदार नामे सुर्यवंशी हा माझ्या आईच्या घरापासुन अर्ध्या किमी अंतरावर त्याच्या पत्नीसह भाड्याने राहात होता. तसेच मृत्यपत्रावरील दुसरा साक्षीदार नामे हेडाऊ हा माझ्या आईच्या घरापासुन एक ते दिड किमी अंतरावर राहत होता. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, तो सेवक परमात्मा होता. माझ्या लेखी बयाणामध्ये व शपथपत्रात साक्षीदार हेडाऊ हा सेवक परमात्मा होता ही बाब लिहीलेली नाही.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, श्री. हेडाउ व श्री. सुर्यवंशी मृत्यूपत्रावरील साक्षीदार हे माझेच मित्र होते.

**प्रश्न-**सदर मृतयूपत्राच्या दिवशी तुम्ही तेथे हजर नसल्याने त्यावेळी तुमच्या आईची मानसिक स्थिती कशी होती याबाबत तुम्हाला काही माहित नव्हते बरोबर आहे काय?

**उत्तर-** सदर दिवशी माझ्या आईची मानसिक स्थिती चांगली होती.

माझी आई सदर मृत्यूपत्र तयार केल्यानंतर दि.१७/४/२०२२ ला मयत झाली.

**प्रश्न-**तुम्हाला कसे माहिती की, मृत्यूपत्र करण्याच्या दिवशी तुमच्या आईची मानसिक स्थिती चांगली होती?

**उत्तर-**सदर दिवशी माझी आई मृत्यूपत्र करायला जाण्यापुर्वी घरी होती.

हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहीणींना वादमिळकतीमध्ये हिस्सा मिळू नये म्हणुन जाणुनबुजुन खोटे मृत्यूपत्र मी माझ्या आईकडून तयार करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले व आजरोजी खोटी साक्ष देत आहे. माझे शिक्षण ग्रॅज्युएशन पर्यंत झालेले आहे.

**<u>वादी क्र.१ व २ तर्फे उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि १८/११/२०२५

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड